# सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन

## प्रथम सत्र संकलित मूल्यमापन

**इयत्ता – चौथी** **विषय – मराठी**

**विद्यार्थ्याचे नाव :** ------------------------------------------------

**शाळेचे नाव :**---------------------------------------- **हजेरी क्र:**---------- **तुकडी :**-------

**केंद्र :**------------- **ता :**-------------- **जि :**-------------- **दिनांक :** / /

| प्रश्न क्रमांक | लेखी | | | | | | तोंडी | | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ४० | |

---

प्र.१) शब्द ऐकून लिही. (५गुण)

१)---------------------- २)-----------------------

३)---------------------- ४)-----------------------

५)---------------------- ६)-----------------------

७)---------------------- ८)-----------------------

९)---------------------- १०)-----------------------

प्र.२) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडव. (५गुण)

अ) खालील वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग कर.

रक्ताचे पाणी करणे --------------------------------------------------

------------------------------------------------------------

ब) खालील शब्दाचे अनेकवचन कर , जसे नदी–नद्या (कोणताही एक)

१)पेढा :------------------------------------------------------

२)कांदा :------------------------------------------------------

क) कवितेच्या ओळी पूर्ण कर.

चवदार तळ्याचे पाणी ,

----------आणी, या शक्तीमागे मूर्ती ,--------देई स्फूर्ती.

ड) घरातील मोठी माणसे कोणते पदार्थ खाऊ नयेत म्हणून सांगतात ?

उत्तर-------------------------------------------------

------------------------------------------------------

इ) कोणाचा जीव झुरणीला लागला आहे? योग्य पर्यायाला गोल कर.

१) धरणीचा २) मातीचा ३) मुलाचा ४) मोरणीचा

प्र.३) खालील जाहिरातीचे निरीक्षण कर व प्रश्नांची उत्तरे लिही. (प्रत्येकी एक गुण ) (५गुण)




अ) शैक्षणिक ॲपची निर्मिती कोणी केली आहे ?

१) समृद्धी पब्लिकेशन २) सार्थक पब्लिकेशन

३) डिजिटल गुरुजी पब्लिकेशन ४) प्रगती पब्लिकेशन

ब) शैक्षणिक ॲपचा उपयोग कोण कोणाला होणार आहे ?

उत्तर :-------------------------------

-----------------------------------

क) शैक्षणिक ॲपची किंमत किती आहे ?

१) २०० रुपये २) मोफत ३) १०० रुपये ४) यापैकी नाही

ड) तुम्ही कोणकोणती शैक्षणिक ॲप वापरता?


उत्तर:-------------------------------------------------

------------------------------------------------------

इ) शैक्षणिक ॲप कोठे मिळणार आहेत?

१) यु ट्यूबवर २) प्ले स्टोअरवर ३) दुकानात ४) वेबसाईटवर

प्र.४.अ) चित्र बघ व चित्राविषयी माहिती लिही. (३गुण)



--------------------------------

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

ब) मोबाईल फोनचे उपयोग लिही? (२गुण)

------------------------------------------------------

------------------------------------------------------

------------------------------------------------------

प्र.५) खालील अपूर्ण गोष्ट पूर्ण कर. (५गुण)



सुप्रिया इयत्ता चौथीत शिकते.तिचे घर शाळेपासून दूर आहे.ती रोज आपल्या मित्रांसोबत बसने शाळेला जाते.एक दिवस शाळेला जात असताना तिला एक काका रस्त्यावर बऱ्याच वेळापासून उभे असलेले दिसले.------------------------------------
------------------------------------
------------------------------------
------------------------------------------------------
------------------------------------------------------
------------------------------------------------------
------------------------------------------------------
------------------------------------------------------
------------------------------------------------------

प्र.६) परिच्छेद वाचन कर व खालील प्रश्न सोडव. (प्रत्येकी एक गुण) (५गुण)

शिक्षण हा सर्व सुधारणांचा पाया आहे,हा विचार सयाजीराव महाराजांनी स्वीकारला.समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे,यासाठी त्यांनी बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा कायदा केला.त्यांनी अनेक गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देऊन,त्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करून परदेशी पाठवले.गोरगरिबांची व दलितांची पिळवणूकीतून सुटका केली.
शेतीची प्रगती करण्यासाठी धरणे बांधली.कापड गिरणी सुरु केली.महाराष्ट्रातील अनेक शिक्षण संस्थाना मदत केली.सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी सत्तेचा वापर केला.सयाजीराव एक आदर्श राजे होते.

अ) सयाजीरावांच्या मते सर्व सुधारणांचा पाया कोणता ? योग्य पर्यायाला गोल कर.

१) सत्ता २) पैसा ३) वैराग्य ४) शिक्षण

ब) सयाजीराव महाराजांनी समाजहिताची कोणती कामे केली ?

उत्तर:------------------------------------------------------
------------------------------------------------------

क) खालील शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिही ? (उदा.जसे, आई-वडील )

गरीब :------------------------------------------------------

ड)सयाजीराव महाराजांनी शिक्षणाबाबत कोणता कायदा केला ?

उत्तर:------------------------------------------------------
------------------------------------------------------

इ)सयाजीराव -------------संस्थानाचे राजे होते.

(कर्नाटक ,बडोदा ,गुजरात ,पुणे)

# अध्ययन निष्पतीवर आधारित तोंडी प्रश्न

तोंडी : १० गुण ⁕तोंडी प्रश्नाबाबत शिक्षकांसाठी सूचना⁕ प्राप्त गुण :

प्रश्न ७) परिच्छेदावरील आधारित तोंडी प्रश्न सोडव.

पाऊस पडेल,या आशेने शेतकरी पेरणी करतात.त्याला धूळपेरणी म्हणतात.पाऊस लवकर पडेल,अशी त्यांना आशा असते.पाऊस उशिरा पडला किंवा फारच कमी पडला तर पेरलेले बी वाया जाते.दुबार पेरणी करावी लागते.हा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही आणि दुबार पेरणीचे पीकही पहिल्या पेरणीसारखे चांगले येत नाही. कधी कधी पाऊस पडतो तर कधी कधी पडतच नाही.उगवलेले पिक वाया जाते.शेतात पिक पिकले तरी पिकांवर अनेकवेळा रोग पडतो.कडाक्याची थंडी पडून देखील पिक वाया जाते आणि शेतकरी संकटात सापडतो.

प्रश्न–१) धूळपेरणी कशाला म्हणतात? (१गुण)
प्रश्न–२) दुबार पेरणी म्हणजे काय? (१गुण)
प्रश्न–३) शेतकरी संकटात कसा सापडतो? (१गुण)
प्रश्न–४) दुष्काळ कशाला म्हणतात ? (१गुण)
प्रश्न–५) शेतकरी शेतात कोणकोणती पिके घेतो? (१गुण)

प्रश्न ८) भाषण,संभाषण व वाचन कौशल्य विकास
अ)तुला येत असलेली एक कविता तालासुरात म्हण. (३गुण)
ब) खालील परिच्छेद वाच. (२गुण)

नाशिकमधील बापू गायधनी यांनी भीषण आगीतून लहान मुलांना आणि जनावरांना वाचवले.त्यासाठी त्यांनी स्वतःचा प्राण गमवला.स्वातंत्र्यापूर्व काळातल्या त्यांच्या या अतुलनीय शौर्याच्या स्मरणार्थ,स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणाऱ्या शूर मुलामुलींना 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार'दिला जातो.दरवर्षी असे जास्तीत जास्त तीन पुरस्कार दिले जाऊ शकतात.

⁕ लेखी प्रश्नाबाबत शिक्षकांना सूचना⁕

प्रश्न १) शब्द ऐकून लिही.(मुलांना खालील शब्द सांगावेत) (प्रत्येकी अर्धा गुण)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) लीला | २) शिंकाळे | ३) संवाद | ४) संपर्क | ५) खानदेश |
| ६) संस्था | ७) पुस्तक | ८) मातीच्या | ९) दात | १०) गजानन |

activeguruji.com